Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 88 – 94

DOI: 10.5281/zenodo.10072563

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे आर्थिक व सामाजिक विचार

प्रा. डॉ. खोकले आर. के.

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय,रेनापूर ४१३५२७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: rkkhokale60@gmail.com

Received: 11 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

**प्रस्तावना**

स्वतंत्र भारताच्या इतिहासात महात्मा गांधींचे नाव सुवर्ण अक्षराने लिहावे इतके महत्त्वाचे आहे. भारताच्या स्वातंत्र्यात महात्मा गांधींचे योगदान महत्त्वाचे आहे.याचा विसर भारतीयांना पडता कामा नये.जीवन जगत असताना सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा जो मार्ग गांधीजींनी समाजाला दाखविला.त्यामुळे ते भारतातच नव्हे तर जगामध्ये अजरामर झाले.स्वतंत्र भारताच्या विकासासाठी महात्मा गांधींनी जे आर्थिक विचार मांडले ते वर्तमान स्थितीत सुद्धा खरे वाटतात.गांधीजींनी राजकीय विकेंद्रीकरणाबरोबर आर्थिक विकेंद्रीकरणावर भर दिला आहे.देशाच्या विकासासाठी त्यांनी नेहमी आर्थिक समतेचा विचार केला.गांधीजींना नेहमी वाटत होते नैतिक विचारांचा प्रभाव आर्थिक जीवनावर असायला हवा.महात्मा गांधीजींनी ज्या विचारांचा आग्रह धरला,जे वास्तवामध्ये त्यांनी प्रत्यक्षामध्ये जीवन जगले व त्यांनी मार्गदर्शन केले ते आजच्या जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या काळात अत्यंत मोलाची वाटतात.महात्मा गांधी यांचे विचार काल,आज आणि उद्यासाठी जगाला मार्गदर्शक ठरतील यात शंका नाही. म्हणून महात्मा गांधी म्हणतात मला असा भारत निर्माण करावयाचा आहे.गरीबातील गरीब माणसाला हा आपला देश आहे व त्याची जडणघडण करण्यामध्ये आपला वाटा आहे असे वाटेल. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त होतील.जाती-जातीचे, धर्मा-धर्माचे लोक गुण्या गोविंदाने नांदतील. देशां- देशामध्ये स्नेहाचे संबंध असतील.अशा पद्धतीने माझे सुंदर भारताचे स्वप्न आहे.

21 व्या शतकाला विकासाचे शतक महणून ओळखले जाते.महात्मा गांधींचे शशक्त भारताचे स्वप्न खरे करावयाचे असेल तर या देशाचा शाश्वत विकास झाला पाहिजे. पण शाश्वत विकास कोणता आहे हे कोणालाही माहित नाही.

विकासाच्या स्पर्धेत भारत देश सुद्धा सामील झाला आहे. पण भारताचा खरा विकास कोणता याबद्दल अनभिज्ञता आढळून येते. गांधीजींच्या विचारानुसार ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे. खेड्याच्या विकासाबरोबर शहराचा विकास होऊ शकतो हे वास्तव असताना आज आपण पाहतो शहराचा विकास मोठ्या प्रमाणावर होतो. परंतु खेड्याचा विकास झालेला दिसून येत नाही.म्हणून खरी गरज शायनिंग व्हिलेजची आहे.म्हणून महात्मा गांधीच्या सामाजिक व आर्थिक विचारांची गरज देशाला आहे.गांधीजी म्हणतात,'भारताचा आत्मा हा खेड्यात आहे'.त्यामुळे खेड्याचा विकास म्हणजे देशाच्या आत्म्याचा विकास होय.

आज जगासमोर व भारत देशासमोर अनेक प्रश्न आहेत. भारताबरोबरच संपूर्ण विश्व विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साह्याने क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे.आधुनिक भारतासमोर आजही अनेक प्रश्न आहेत.ज्याचे उत्तर निश्चित गांधी विचारांच्या माध्यमाने सापडू शकेल. महात्मा गांधीनी असे म्हटले होते की, देशाला आदर्श बनविण्यासाठी राजकारणाला धर्माची जोड देणे आवश्यक आहे.परंतु कोणता धर्म त्यांच्या दृष्टीने अपेक्षित होता? तर मानव धर्म व नैतिकता याची झालर राजकारणाला असेल तर देशातील जनतेला चारित्र्यवान बनवून देशाला सुद्धा चारित्र्यवान बनविता येईल.

भारत एकीकडे महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतो आहे. परंतु भारताची दुसरी बाजू पाहिली तर आजही अन्न,वस्त्र,निवारा, शिक्षण आणि आरोग्य यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करता आलेल्या नाहीत. आजही देशात सुशिक्षितांचे प्रमाण कमी आहे. भारतासमोर दारिद्र्य,बेकारी,आर्थिक विषमता, भ्रष्टाचार,देशातील गुन्हेगारी,स्त्रियांना सन्मानाची वागणूक केव्हा मिळेल? शेतकऱ्याच्या आत्महत्या कशा रोखता येतील? या सर्व समस्या वर मात करावयाची असेल तर त्याचे मूळ उत्तर गांधी विचारात दडलेले आहे. गांधींनी म्हटले होते की, भारत हा खेड्याचा देश आहे, खरा भारत देश पाहावयाचा असेल तर खेड्याकडे चला असे आव्हान गांधीजींनी केले होते. त्यांच्या मते वरील समस्यावर मात करावयाची असेल तर, देशाच्या नेतृत्वाला प्रथम ग्रामीण विकास घडवून आणणे महत्त्वाचे आहे.म्हणून देशाचा शाश्वत विकास करावयाचा असेल तर महात्मा गांधी यांचे विचार काल आज व भविष्यामध्ये कसे महत्त्वाचे आहेत या अनुषंगाने गांधीजींचे सामाजिक व आर्थिक विचारांची देशालाच नव्हे तर जगाला आवश्यकता आहे हेच या शोधनिबंधातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारतीय आर्थिक विचारांमध्ये गांधीजींचे स्थान अभ्यासणे.

२. महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्य कल्पना अभ्यासणे.

३. महात्मा गांधींचे सामाजिक विचार अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधिबंधाकरिता दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे संदर्भ ग्रंथ मासिके याच्या आधारे संशोधन लेख लिहिण्यात आला आहे. वरील उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**महात्मा गांधीचे आर्थिक विचार**

महात्मा गांधी ने मांडलेल्या आर्थिक विचारानुसार ब्रिटिशांनी भारतीय संपत्तीची मोठ्या प्रमाणात लूट केली होती. गांधींनी पैसा आणि संपत्तीपेक्षा मानवी मूल्यावर अधिक भर दिला होता.महात्मा गांधी यांनी जगाला सत्य,अहिंसेचा संदेश दिला नाही तर आर्थिक विकासासाठी त्यांनी अनेक विचार मांडले.त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारापैकी काही विचार आजच्या नवीन आर्थिक धोरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे आहेत असे मला वाटते.

**1) ग्राम स्वराज्य**

गांधीजींच्या आर्थिक विचारांचा ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबन हा गाभा आहे.गांधीजींना मानवाच्या जीवन आवश्यक गरजांच्या बाबतीत प्रत्येक गाव स्वयंपूर्ण अपेक्षित होते.प्राचीन भारतात खेडे संपूर्ण होती.खेड्याचा विकास या तत्त्वावर गांधींचे अर्थशास्त्र अवलंबून होते. खेड्याचा विकास झाला तर देशाचा विकास होईल अशी ठाम भूमिका गांधीजींची होती. आज देखील वाटते ग्रामीण भागाचा विकास जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशाचा विकास होणार नाही.म्हणून आजही गांधीजींच्या विचारांची आवश्यकता भासताना दिसते.आपण आज खेड्याकडे दुर्लक्ष करताना दिसतो.आज आपले विचार बदलले आहेत. आपण मानतो शहराचा विकास झाला म्हणजे देशाचा विकास होतो. म्हणून भारताच्या सर्वांगीण विकासासाठी गांधींनी ग्रामीण विकासावर भर दिला. त्यांनी ग्राम राज्य ही संकल्पना मांडली. त्यासाठी श्रमप्रतिष्ठा, स्वयंपूर्णता, विकेंद्रीकरण, ग्रामीण व्यावसायिक शिक्षण, सहकारी शेती, अस्पृश्यता निवारण, स्त्री उद्धार, आर्थिक समता या बाबी पुन्हा देशामध्ये येण्यासाठी गांधीजींच्या विचारानुसार पुन्हा एकदा गांधींचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर भारताचा आत्मा खेड्यात आहे, म्हणून खेड्याकडे चला हा विचार समाजामध्ये रुजण्याची गरज आहे.

**2) विश्वस्त संकल्पना**

गांधीजींच्या आर्थिक विचारात विश्वस्त संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. समाजात असणारी विषमतेची दरी नष्ट करावयाची असेल तर भांडवलदार व श्रीमंत वर्गानी आपल्याला आवश्यक तेवढी संपत्ती जवळ बाळगावी. राहिलेली संपत्ती समाजातील गरीब वर्गाला उद्योगधंदे काढून देण्यासाठी वापरावी. त्यामुळे समाजातील आर्थिक विषमता नाहीशी होईल. गांधीने आर्थिक विकेंद्रीकरणाचे समर्थन केले. भांडवलदारांनी मालकाची नव्हे तर विश्वासाची भूमिका बजावावी.गांधीजींनी विश्वस्त संकल्पना भांडवलशाहीच्या शोषणाला पर्यायी व्यवस्था म्हणून वापरली. यामध्ये श्रीमंत आणि गरिबांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असावे व आपल्याकडील अतिरिक्त संपत्तीचा वापर गरिबांचे आर्थिक कल्याण करण्यावर खर्च करावा. अशी गांधीजींची धारणा होती. गांधीजींना भांडवलशाही समाजाला अहिंसक मार्गाने न्याय पूर्ण समाजात रूपांतर करावयाचे होते.

### 3) स्वदेशी

स्वदेशी म्हणजे गांधीजींचे त्या काळातील राजकीय शस्त्र होय. विदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगाला संरक्षण देणे हा चळवळीचा हेतू होता. स्वदेशी म्हणजे देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरण्यास उत्तेजन देणे. त्यामुळे देशी उद्योगांना उत्तेजन मिळेल. देशी उत्पादन,रोजगार,राहणीमान यात वाढ घडून येईल. त्यामुळे देशात निर्माण होणाऱ्या समस्या सुटतील. स्वदेशी बाबत गांधीजींचे विचार असेही होते की,जो उद्योग भारतीय जनतेच्या हिताचा असेल असा कोणताही उद्योग स्वदेशी उद्योग होय. व त्यात तयार होणारा माल स्वदेशी माल होय.स्वदेशीचा स्वीकार म्हणजे विदेशी व्यापार आणि विदेशी वस्तूचा एकदम त्या करणे असे गांधीजींना अभिप्रेत नव्हते. परस्परांच्या गरजा भागविण्यासाठी व्यापार असावा हे तत्व त्यांना मान्य होते. त्यांची स्वदेशी संकल्पना आर्थिक विचाराबरोबर नैतिक आणि भावनिक तत्व प्रणालीवर अवलंबून होती. म्हणून गांधींच्या विचारांची कालही गरज होती,आजही गरज आहे,व उद्याही गरज असेल असे मला वाटते.

### 4) संपत्ती विषयक विचार

गांधीजींच्या विचारातून जगाला दिव्य संदेश दिला. त्यांच्या मते मनुष्याला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी संपत्ती जवळ ठेवावी व अतिरिक्त संपत्ती गरीब लोकांना द्यावी. म्हणजे सर्व समान राहतील. पण आज भारताचा विचार केला तर एक टक्के लोकांकडे देशातील एकूण संपत्तीच्या 58% संपत्ती एकवटली आहे. सर्वोच्च दहा टक्के लोकांकडे एकूण संपत्तीच्या 76.3% संपत्ती आहे. आणि 90% लोकांकडे 23.7% संपत्ती आहे. ही विषमता दूर करावयाची असेल तर महात्मा गांधींच्या विचारांची आवश्यकता असताना दिसून येते.

### 5) शेती विषयक विचार

गांधीजींच्या मते शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु आज भारतात सर्वात जास्त वाईट परिस्थिती असेल तर ती शेतकऱ्यांची आहे. कारण भारतात भू-धारणा विभाजनात मोठ्या प्रमाणात विषमता आढळून येते. भारतातील 85% लोकांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी भू-धारणा आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर शेतकरी आर्थिक परिस्थितीतून आत्महत्या करीत आहेत.

### 6) ग्रामीण औद्योगीकरण

गांधीजींच्या आर्थिक विचारांमध्ये ग्रामीण औद्योगीकरणाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. गांधीजींनी यांत्रिकीकरण, पाश्चतंय संस्कृतीमधील भोगवादाचे प्राबल्य त्यांनी नाकारले होते. ग्रामीण औद्योगीकरणाच्या संदर्भात लक्षात घेण्याची महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे गांधीजींना ग्रामीण भारताचे औद्योगीकरण अपेक्षित असण्यापेक्षा ग्रामीणीकरण हवे होते. यामध्ये फक्त खादी उद्योगांचा समावेश नव्हता, तर समग्र ग्रामीण पातळीवर स्थापन होणारे उद्योग अपेक्षित होते.

**7) सर्वोदय**

'सर्वोदय ' याचा अर्थ सर्वाचे कल्याण होय. सर्व व्यक्तींना जगण्यासाठी मिळकत असणे आवश्यक आहे. गांधीजींच्या मते सर्वोदयाचा अर्थ जेथे शुद्धता आणि विद्वता याचे अस्तित्व असते. सर्वोदयात प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळण्याचा अधिकार असेल. सर्वोदय संकल्पने त्यांचा भर खेड्याच्या विकासावर होता. सर्वोदयाशिवाय सर्वोदय समाज निर्माण होणार नाही. अशी त्यांची धारणा होती.

**महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार**

गांधीजींच्या आर्थिक विचाराबरोबरच त्यांच्या सामाजिक विचारातून गांधीचे विचार आजच्या काळाला कसे अनुकूल आहे ते लक्षात येते.

**1) व्यसनमुक्त समाज निर्मिती**

भारतीय समाज भोगवादा बरोबर मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी गेला आहे. पाश्चतंय संस्कृतीच्या प्रभावामुळे व्यसन हे प्रतिष्ठेचे लक्षण बनत चालले आहे. मध्यमवर्गीया पेक्षा श्रीमंत आणि गरीब वर्गामध्ये व्यसनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळून येते. व्यसन हे अनेक समस्या चे मूळ आहे. बेकारी,दारिद्र्य,आरोग्याच्या समस्या याचा जन्म व्यसना मधून होतो. व्यसनामुळे समाजा विवेकहीन व दिशाहीन बनत चालला आहे. म्हणून जर निरोगी व स्वस्थ समाजाच्या निर्मितीसाठी गांधीजींनी सांगितलेल्या व्यसनमुक्तीच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे.

**2) गांधीजींचे शिक्षण विषयक विचार**

महात्मा गांधींनी मानवतावादी दृष्टिकोनातून शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अर्थ मांडलेला दिसतो. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. माणसाला माणूस बनविणारे,त्यांना उद्योग देणारे आणि चारित्र्यसंपन्न बनविणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. शिक्षण हे काही साध्य नाही साधन आहे असे त्यांचे मत होते. शिक्षणातून स्वावलंबन निर्माण झाले पाहिजे. चारित्र्यसंवर्धन झाले पाहिजे, समता,सहिष्णुता व सहकार्य या गुणाची वाढ झाली पाहिजे. अशा अपेक्षा गांधींच्या शिक्षणासंबंधी होत्या. आजच्या शिक्षण पद्धतीचा आणि विचार करतो. शिक्षण व्यवस्थेमधून बेकारांचे लोंढे बाहेर पडताना दिसून येतात. शिक्षणातून चारित्र्यसंवर्धन होण्याऐवजी खून,बलात्कार यासारख्या घटना शिक्षित तरुणांच्या हातून घडताना दिसतात. त्यामुळे गांधीजींचे विचार आजही मोलाचे वाटतात.

**3) धर्मविषयक विचार**

सर्वधर्म सारखेच व चांगलेच आहेत अशी गांधीजींची श्रद्धा होती. त्यामुळे प्रत्येकानी आपआपल्या धर्माप्रमाणे वागल्यास त्याचे कल्याण होईल. पण धर्माधर्मातील भांडणे मिटतील त्यावर त्यांचा ठाम विश्वास होता. आता धर्मा-धर्मात भांडणे होतात.अनेक ठिकाणी दंगे, जाळपोळ होताना दिसते.यामध्ये हजारो निष्पाप व्यक्तीचे बळी जातात. आम्ही खरा

धर्म न समजून घेता धर्माची दांभिकता बाळगतो म्हणून समाजामध्ये एक धर्म दुसऱ्या धर्माला शत्रू मानतो. महात्मा गांधी ने सर्वच धर्म मानवी कल्याणासाठी निर्माण झाल्याचे सांगितले. त्यांचे विचार आजही महत्त्वाचे वाटतात.

**4) जातीयतेला विरोध**

महात्मा गांधी ने जातीयतेला प्रखर विरोध केला. यासाठी त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्य व अस्पृश्यता निवारण या गोष्टींना अधिक महत्त्व देऊन राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावली. राष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लावण्यासाठी त्यांनी सत्य व अहिंसा या मार्गाचा स्वीकार केला. सत्याग्रह, सविनय कायदेभंग आणि असहकार इत्यादी साधनांचा वापर करून त्यांनी राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावली.

**5) श्रमप्रतिष्ठा**

महात्मा गांधींनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. याबाबत त्यांनी 1947 मध्ये हरिजन मध्ये आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणतात प्रत्येक व्यक्तीने शारीरिक कष्ट केले पाहिजे असा माझा आग्रह आहे. गांधीजींच्या मते प्रत्येकाने स्वतःचे अन्न मिळविण्याइतके तरी श्रम केले पाहिजे. श्रीमंत आणि गरीब असा भेद न करता सर्वांनी श्रम केले पाहिजे. एकूणच त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

**6) चंगळवाद रोखण्यासाठी**

21व्या शतकात मानवाने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. वाढत्या प्रगतीमुळे मानवात बदल झाला आहे.' वापरा व फेकून द्या ' ही संस्कृती रुजत आहे. त्यामुळे सर्वत्र चंगळवाद दिसून येतो. हा चंगळवाद कमी करण्यासाठी साधी राहणी उच्चविचार या गांधींच्या विचाराची आवश्यकता आहे.

**सारांश**

महात्मा गांधींचे विचार हे शाश्वत स्वरूपाचे आहेत. त्यांनी सांगितलेले मूल्ये चिरकाल टिकणारे आहेत. त्यांचे विचार व मूल्याच्या अनुकरणाने मानवी जीवनातील अनेक प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता त्यांच्या विचारांमध्ये आहे. त्यामुळे भारताचा खरा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर भारताला खरी गरज आहे ती गांधीजींच्या विचाराची. 'Make in lndia' **ऐवजी** 'Make in Agriculture' **आणि** 'Smart City' **ऐवजी** 'Smart Village' **ची** आवश्यकता आहे असे मला वाटते. गांधी विचारांचे मंथन केल्यानंतर असे लक्षात येते की,गांधींनी केवळ देशातील नव्हे तर गावातील आर्थिक, सामाजिक चिंतनाला एक नवी दिशा दिली यातच त्यांची थोरवी आहे.

**संदर्भ सूची**

१. महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान, डॉ. रामेश्वर भिसे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२. लोकसेवक, प्रा. अमर जावळे, प्रा. भूषण काटे -पाटील, प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

३. आर्थिक विचार व विचारवंत, डॉ. बी. डी. कुलकर्णी, डॉ. एस. व्ही. ढमढेरे, डायमंड पब्लिकेशन,पुणे.

४. महात्मा गांधी :एक शोध, राम प्रधान, मायबोली प्रकाशन,मुंबई.

५. भारतीय राजकीय विचारवंत, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, विद्याभारती प्रकाशन,लातूर.

६. आर्थिक विचारांचा इतिहास, प्रा. डॉ. बी. डी. इंगळे, अरुणा प्रकाशन, लातूर.

७. राष्ट्र निर्माता-बापू, नारायणभाई देसाई, गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव.

८. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, गांधी मोहनदास करमचंद, नवजीवन प्रकाशन,अहमदाबाद.

९. कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, कवीमंडल विजय, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.